# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)

## (महाविद्यालयीन विभाग)

डॉ. एस.एम.रोकडे
संचालक (प्रभारी)

जा.क्र./महा.वि./गो.वि./१६० /२०१५
दिनांक : ०६/ ०२/२०१५

प्रति,

मा. प्राचार्य,
चंद्रपूर जिल्हयातील,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:— जिल्हा साहित्य संमेलनाला मराठी विषयाच्या प्राध्यापकांनी उपस्थित राहण्याबाबत..

संदर्भ :— पत्र क्र. सूसासांमंच/०४/१५ दि. ३०/१/२०१५

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, दि. १४ व १५ फेब्रुवारी, २०१५ रोजी सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे २ दिवसीय जिल्हा साहित्य संमेलनाचे आयोजन केलेले आहे. या संमेलनात साहित्यीक व लेखक इ. ची उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्हयातील विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील मराठी विषयाच्या प्राध्यापकांना उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात यावे.

धन्यवाद!

संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५
फोन नंबर ०७१३२—२१६५९४ **E-Mail** : arcollegesectiongug48@gmail.com

# सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंच, चंद्रपूर

आयोजित

# जिल्हा साहित्य संम्मेलन-२०१५

स्थापना - २०१२

**१४ व १५ फेब्रुवारी २०१५**

**स्थळ : सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर**


• संवर्धक •
श्री. शांताराम पोटदुखे
माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री, भारत सरकार

• स्वागताध्यक्ष •
श्री. संजय वैद्य
सदस्य, महानगर पालिका, चंद्रपूर

• निमंत्रक •
डॉ. जाकीर शेख
केंद्रीय प्रतिनिधी, वि. सा. संघ, नागपूर

• कार्यवाह •
श्री. प्रदीप खांडरे, प्रा. विमल गाडेकर
डॉ. विद्याधर बन्सोड, श्री. मिलींद योरकर
डॉ. अंजली हस्तक, डॉ. प्रभा वाराडे

• उपाध्यक्ष •
डॉ. मंगेश गुलवाडे,
श्री. सुनिल कुलकर्णी श्री. प्रशांत आर्वे,
श्री. अशोकसिंग ठाकूर
सौ. नंदीनी देवईकर,
डॉ. जयश्री कापसे-गावंडे

• सचिव •
श्री. इरफान शेख,
प्रा. प्रशांत ठाकरे
प्रा. रविकांत वरारकर

• सहसचिव •
श्री. डॉ. संजय उराडे
श्री. विवेक पत्तीवार,
प्रा. विजय बदखल
श्री. धनंजय जिराफे, श्री. संजय जावडे

• सदस्य •
श्री. अमर रामटेके श्री. पोर्णिमा बावणे,
श्री. सुहास नेमाडे, श्री. उमेश बन्सोड
श्री. बी. सी. नगराळे, श्री. बंडोपंत बोढेकर

• कोषाध्यक्ष •
श्री. रंगनाथ रायपुरे


जा.क्र. : सूसासांमंच/ ०४ / १५ विनंतीपत्र दिनांक : 30-09-2014

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलगुरुंचे कार्यालय
आवक क्र. 82 दि. 03/02/15
जावक क्र. 106 दि. 04/02/15

प्रति,
मा.डॉ. किर्तीवर्धनजी दिक्षित
कुलगुरू
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली

**विषय — जिल्हा साहित्य संमेलनाला मराठी विषयाच्या प्राध्यापकांनी उपस्थित राहण्याबाबत**

सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंचातर्फे मराठी साहित्याप्रति जागरूकता निर्माण व्हावी, वाचनचळवळ अधिक सक्षम व्हावी व नवलेखकांच्या लेखनकौशल्याला वाव मिळावा यासाठी वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. सूर्यांश आता जनसामान्य लेखकांची व रसिकांची हक्काची चळवळ झालेली आहे ही आनंदाची बाब आहे.

दि. १४ व १५ फेब्रुवारी २०१५ ला आम्ही चंद्रपूर येथील सरदार पटेल महाविद्यालयात २ दिवसीय जिल्हा साहित्य संमेलनाचे आयोजन करीत असून या संमेलनात जिल्हाभरातील २०० च्या वर साहित्यिक व लेखक तसेच रसिकांची उपस्थिती राहणार आहे. सदर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. राजन जयस्वाल राहतील तर उद्घाटन ज्येष्ठ आदीवासी साहित्यिक डॉ. विनायक तुमराम करतील. या संमेलनात गोंडवाना विद्यापीठातंर्गत असलेल्या चंद्रपूर जिल्हयातील महाविद्यालयातील मराठी विषयाच्या प्राध्यापकांना समाविष्ट करण्याचा आमचा मानस आहे. तरी प्राध्यापकांना सदर संमेलनाला पाठविण्यासंबंधी आपण महाविद्यालयांना सुचना करावी ही विनंती. आपले सहकार्य आमच्यासाठी मोलाचे आहे. आपण आम्हास सहकार्य करावे.

आपल्या सहकार्यामुळे आमची ही साहित्य चळवळ चंद्रपूरातील साहित्यप्रांतात आपली ओळख अधिक दृढ करेल असा विश्वास आहे.

आपण आम्हाला सहकार्य कराल या विश्वासाने आम्ही आशान्वित आहोत. आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत.

आपले विनित

| इरफान शेख | मिलिंद बोरकर | सौ. सीमा पाटील |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | उपाध्यक्ष |